महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७८ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१९५० : सारनाथ येथील अशोक स्तंभावरील सिंह शीर्ष हे राष्ट्रीय चिन्ह म्हणून स्वीकारण्यात आले.

१९५० : राष्ट्रपती म्हणून डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी कार्यभार स्वीकारला.

१९५६ : डॉ. राजेंद्र प्रसाद यांना भारतरत्न हा किताब मिळाला.

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८१,५३७.७० −७६९.६६ (०.९४%) |
| डॉलर | ₹ ९१.९१ |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १९ | ०६ |
| मुंबई | ३१ | १८ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३० | ११ |

**आज प्रजासत्ताक दिन**




**सुटीची सूचना**

प्रजासत्ताक दिनानिमित्त **दैनिक शौर्य मराठी** कार्यालयाला आज दि.२६ जानेवारी रोजी सुटी राहिल. त्यामुळे दि.२७ जानेवारी रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व वाचक, हितचिंतक व जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

– मुख्य संपादक

**सुविचार**

शाळा म्हणजे केवळ अभ्यासाचं ठिकाण नाही, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याचं केंद्र आहे

| सुर्योदय | सुर्यास्त |
|---|---|
| स.-७:०७ | संध्या-६:१४ |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५९,८९५/- | ३,३५,०००/- |

**केळी भाव**

| | |
|---|---|
| नवती | : १३५५ ते १३६० |
| पिल बाग | : ११०१ ते ११०२ |
| कांदे बाग | : ---- |

# पद्म पुरस्कारांची घोषणा; महाराष्ट्रातील चौघांचा समावेश

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला भारत सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षी तब्बल १३१ जणांना पद्म पुरस्काराने गैरवण्यात येणार असून यात ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कार जाहीर करण्यात आलेल्यांमध्ये दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी अनेक दिग्गजांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर, शेतकरी श्रीरंग लाड, पालघरमधील वारली संगीतकार भिकल्या लाडक्या धिंडा आणि आर्मिंदा फर्नांडीस यांचा देखील यात समावेश आहे.**

कला, समाज सेवा, उद्योग, विज्ञान, वैद्यकशास्त्र आणि खेळ अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना पद्म




पुरस्काराने गैरवण्यात आलं आहे. ज्यांना पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत, अशा व्यक्तींना राष्ट्रपती भवनात आयोजित खास कार्यक्रमामध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. कला क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

(पान २ वर)

➤ **पद्म पुरस्कारासाठी केंद्र सरकारने ४५ मान्यवरांची निवड केली असून प्रजासत्ता दिनाच्या पूर्वसंध्येला सर्व सन्मानितांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. यात महाराष्ट्रातील रघुवीर खेडकर, भिकल्या लडक्या धिंडा, श्रीरंग देवबा लाड, आर्मिंदा फर्नांडीस या चौघा मान्यवरांचा समावेश आहे.**

➤ **क्रीडा क्षेत्रातून भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि स्टार फलंदाज रोहित शर्मा यांची पद्मश्री पुरस्कारासाठी निवड झाली आहे. विजय अमृतराज (टेनिस) यांना पद्मभूषण तर रोहित शर्मा (क्रिकेट), हरमनप्रीत कौर (क्रिकेट), प्रवीणकुमार (पॅरा–थलेटिक्स), बलदेव सिंग (हॉकी), भगवानदास रायकवार (पारंपारिक मार्शल आर्ट्स), के. पंजनिवेल (सिलंबम), सविता पुनिया (हॉकी), व्लादिमीर मेस्तविरिशविली (कुस्ती प्रशिक्षक) (मरणोत्तर) यांना पद्मश्री पुरस्कार देण्यात येणार आहे.**



## प्रजासत्ताक दिनासाठी राजधानी सज्ज

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

७७ वा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी साजरा केला जाणार आहे. या खास दिवसाची तयारी पूर्ण झाली असून कर्तव्य पथावरील खास कार्यक्रमासाठी राजधानीत देशभरातील नागरिक पोहोचले आहेत. यंदाचा प्रजासत्ताक दिन विशेष असणार आहे. यात ऑपरेशन सिंदूर आणि सशस्त्र दलांच्या शौर्याचे प्रदर्शन केले जाणार आहे.

या वर्षीच्या प्रजासत्ताक दिनाची थीम वंदे मातरमच्या १५० व्या वर्धापन दिनावर आधारित आहे. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनादरम्यान कर्तव्य पथावर वंदे मातरमशी संबंधित विशेष चित्रे आणि प्रदर्शने प्रदर्शित केली जाणार आहेत. परेडच्या शेवटी, वंदे मातरम लिहिलेल्या बॅनरचे अनावरण केले जाईल आणि रबरी फुगे सोडले जातील. हा कार्यक्रम देशभक्ती आणि स्वावलंबी भारताच्या संकल्पाला समर्पित असेल. या वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात विशेषतः देशाची सांस्कृतिक विविधता आणि देशभक्तीची भावना दिसून येणार आहे. कर्तव्य पथावर पारंपारिक पोशाखातील ५० जोडपी दिसणार आहेत. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातून सुमारे ५० जोडप्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. ही जोडपी त्यांच्या संबंधित प्रादेशिक पारंपारिक पोशाखात दिसतील, जी भारताच्या एकता आणि विविधतेचा संदेश देतील. पर्यटन मंत्रालय दि.२६ ते ३१ जानेवारीदरम्यान लाल किल्ल्यावर भारत पर्व आयोजित करणार आहे. या भारत पर्वात प्रजासत्ताक दिनाचे चित्ररथ, प्रादेशिक पाककृती, हस्तकला आणि हातमाग, सांस्कृतिक कार्यक्रम आणि केंद्रीय मंत्रालयांचे स्टॉल असतील. यात चंदीगड, लडाख, अरुणाचल प्रदेश, बिहार, दिल्ली, गोवा, झारखंड, कर्नाटक, त्रिपुरा, उत्तराखंड आणि डीआरडीओचे स्टॉल असणार आहेत.

### ➤ अँटोनियो कोस्टा, उर्सुला वॉन डेर लेयन प्रमुख पाहुणे म्हणून राहणार उपस्थित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून, युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन या दि.२५ ते २७ जानेवारी या काळात भारत दौऱ्यावर येणार आहेत. दोन्ही नेते ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून सहभागी होतील. भारत–युरोपियन युनियन संबंध अधिक मजबूत करण्यासाठी ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

## ठाकरे गटाचे माजी आ.दिनकर माने करणार भाजपात प्रवेश

वृत्तसंस्था । लातुर

**लातूरमध्ये शिवसेना ठाकरे गटाला खिंडार पडलं आहे. औसा तालुक्यातील शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार दिनकरराव माने हे उद्या आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश करणार आहेत. भाजपच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात हा पक्षप्रवेश होणार** आहे.

या पक्षप्रवेशामुळे भाजपा आमदार अभिमन्यू पवार यांची औसा तालुक्यात ताकद वाढणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा पक्षप्रवेश झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. दिनकरराव माने यांनी २०४ मध्ये अभिमन्यू पवार यांच्या विरोधात विधानसभा निवडणूक (पान २ वर)

## नर्सिंग सीईटीचे वेळापत्रक जाहीर; नोंदणी प्रक्रियेला सुरूवात

वृत्तसंस्था । पुणे

**राज्य सीईटी सेलतर्फे शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी घेण्यात येणाऱ्या नर्सिंग अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बीएस्सी नर्सिंग, जनरल नर्सिंग अँड मिडवायफरी (जीएनएम), डिप्लोमा इन सायकॅट्रिक (डीपीएन) आणि पब्लिक हेल्थ नर्सिंग (पीएचएन) या अभ्यासक्रमांच्या सीईटीसाठी २४ जानेवारी २०२६ पासून ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू होत आहे.**

इच्छुक उमेदवारांना २४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अधिकृत संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करता येतील. गेल्या काही वर्षांत नर्सिंग क्षेत्राकडे वाढता कल पाहता यावर्षीही मोठ्या संख्येने अर्ज येण्याची शक्यता आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२५ च्या नर्सिंग सीईटीसाठी ४७ (पान २ वर)




**थोडक्यात**

### भारताची टी–२० मालिकेत विजयी आघाडी

**गुवाहाटी ।** सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात टीम इंडियाने न्यूझीलंडला तिसऱ्या टी–२० मॅचमध्ये पराभूत केलं आहे. न्यूझीलंडने पहिल्यांदा फलंदाजी करताना ९ बाद १५३ धावा केल्या होत्या. भारताने हे आव्हान १० ओव्हरमध्ये पार केलं. भारताने न्यूझीलंडला ८ विकेटनं पराभूत केलं. भारतासाठी दिलासादायक बाब म्हणजे सूर्यकुमार यादवनं सलग दुसऱ्या टी–२० मॅचमध्ये अर्धशतक झळकावलं. सलामीवीर अभिषेक शर्मानं १४ बॉलमध्ये अर्धशतक झळकावलं. या विजयासह भारतानं पाच सामन्यांच्या टी २० मालिकेत ३–० अशी विजयी आघाडी घेतली आहे. भारतानं या विजयासह वनडे मालिकेतील पराभवाचा वचपा काढला आहे.

## टी–२० वर्ल्ड कप : टीम इंडियासह १६ देशांचे संघ जाहीर

### चार संघांकडून अद्याप घोषणा बाकी

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**टी–२० वर्ल्ड कप २०२६ सुरू होण्यासाठी अवघे दोन आठवडे उरले असून ७ फेब्रुवारीपासून भारत आणि श्रीलंका येथे आयसीसी टी–२० विश्वचषकाला सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत २० संघ सहभागी होणार आहेत. दरम्यान, आतापर्यंत या टूर्नामेंटसाठी फक्त १६ संघांचेच स्कॉड जाहीर झाले आहेत. यामध्ये भारत आणि पाकिस्तानसह प्रमुख संघांचा समावेश आहे.**




अजूनही ४ देश असे आहेत, ज्यांनी आपापल्या संघाची घोषणा केलेली नाही. यामध्ये नवोदित स्कॉटलंडचाही समावेश असून, तो बांगलादेशच्या जागी टी–२० वर्ल्ड कप २०२६ मध्ये खेळताना दिसणार आहे. टीम इंडियाने जाहीर केलेल्या संघात सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, इशान किशन, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रिंकू सिंग आदींचा समावेश आहे. स्पर्धेत भारत, अमेरिका, नामिबिया, नेदरलँड्स, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, झिम्बाब्वे, आयर्लंड, ओमान, इंग्लंड, वेस्ट इंडिज, स्कॉटलंड, इटली, नेपाळ, अफगाणिस्तान, दक्षिण आफ्रिका, कॅनडा, यूएई आदी संघ सहभागी होणार आहेत. यातील १६ संघांनी स्कॉड जाहीर केले असून अमेरिका, वेस्ट इंडिज, स्कॉटलंड आणि यूएई यांनी अजून तरी संघाची घोषणा केलेली नाही.

## बार्शीनंतर आता माढ्यातही दोन्ही शिवसेना एकत्र

वृत्तसंस्था । सोलापूर

**राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचं बिगूल वाजलं असून येत्या पाच तारखेला मतदान तर सात तारखेला मतमोजणी होणार आहे. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे.**

सोलापूर जिल्हातल्या बार्शीनंतर आता माढ्यात देखील दोन्ही शिवसेना एकत्र आल्या आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि शिवसेना शिंदे गट आणि दोन्ही राष्ट्रवादींची युती झाली आहे. भाजपच्या पॅनलविरोधात हे चारही पक्ष एकत्र आल्यानं आता भाजप समोरील आव्हान मोठं असणार आहे.

**माढ्याचे खासदार धैर्यशिल मोहिते पाटील आणि आमदार अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे पॅनल तयार करण्यात आलं आहे. दोन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या एकत्रिकरणानंतर आता याठिकाणी शिवसेना शिंदे गट आणि शिवसेना ठाकरे गट देखील एकत्र आले आहेत. भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी ही एक वेगळी युती तयार करण्यात आली आहे. या युतीच्या प्रचाराचा शुभारंभ माढ्यातील रांझणी येथे विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे, या मतदारसंघात सर्वच पक्ष भाजपाविरोधात एकवटल्यानं या ठिकाणी विजय मिळवताना भाजपचा कसं लागणार आहे.**

# विविध क्षेत्रातील कामगिरीसाठी महाराष्ट्रातील ८९ अधिकारी, कर्मचाऱ्यांना पुरस्कार जाहीर

## जळगावचे उपनिरीक्षक संजय शेलार यांचा समावेश

वृत्तसंस्था । मुंबई

**भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त देशातील पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील ९८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. महाराष्ट्रातील ८९ अधिकारी व कर्मचारी यांना देखील विविध क्षेत्रातील कामगिरीसाठी पुरस्कार जाहीर झाले आहेत. यामध्ये ३१ पोलीस कर्मचाऱ्यांना मवीरता पदकफ, उत्कृष्ट आणि विशिष्ट सेवेसाठी दिला जाणारे मराष्ट्रपती पदकफ, पोलीस दलातील ४ अधिकारी आणि सुधारात्मक सेवा विभागातील २ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृहमंत्रालयामार्फत दरवर्षी पोलीस, अग्निशमन, होमगार्ड आणि सुधारात्मक सेवेतील कार्यासाठी शौर्य आणि सेवा पदके जाहीर केले जातात. वीरता पदक (पोलीस सेवा) जाहीर झालेल्यांमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल फडतरे, वासुदेव मडावी, मधुकर नैताम, नाईक पोलीस कॉन्स्टेबल संतोष नैताम, कै.सुधाकर वेलादी (मरणोपरांत), विलास पोर्टेट, विश्वनाथ सदमेक, ज्ञानेश्वर फाडणे, दिलीप सद्मेक, रामसू नरोटे, आनंदराव उसेंडी, राजू चव्हाण, पोलीस कॉन्स्टेबल अरुण मेश्राम, नितेश वेलाडी, मोहन उसेंडी, संदिप वसाके, कैलास कोवासे, हरिदास कुलयेती, किशोर तलांडे, अनिल आलम, नरेंद्र मडावी, आकाश उईके, स्वर्गीय करे इरपा आत्राम (मरणोपरांत), राजू पुसाळी, महेश जकेवार, रुपेश कोडापे, मुकेश सडमेक, योगेंद्रराव सदमेक, घिस्सू आत्राम, अतुल मडावी, विश्वनाथ मडावी, विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झालेल्यांमध्ये अतिरिक्त आयुक्त महेश पाटील, पोलीस उपायुक्त बाळकृष्ण यादव, सहाय्यक पोलीस आयुक्त सायरस इराणी, विठ्ठल कुबडे, सुधारात्मक सेवासाठी पुरस्कार जाहीर झालेल्यांमध्ये सुभेदार विजय परब, हवालदार राजू हेटे, उत्कृष्ट सेवेसाठी पदक जाहीर झालेल्यांमध्ये पोलीस महानिरीक्षक राजीव वीरेंद्र कुमार जैन, सुधीर कल्ल्या हिरेमठ, पोलीस अधीक्षक शीला दिनकर साहिल, मोहन मुरलीधर दहीकर, पुरुषोतम नारायण कराड, अतिरिक्त पोलीस अधीक्षक किरण जितेंद्रसिंह पाटील, पोलीस उपअधीक्षक नीलम प्रशांत वाव्हळ, निरीक्षक अविनाश शंकरराव शिळीमकर, पोलीस उपअधीक्षक गजानन रामराव शेळके, सहाय्यक पोलीस आयुक्त महेश रमेश तावडे,अतिरिक्त पोलीस अधीक्षक विजय मारोतीराव माहुलकर, सहाय्यक पोलीस आयुक्त समीर नारायण साळुंके, पोलीस उपअधीक्षक पराग बापूराव पोटे, दयानंद सदाशिव गावडे, पुष्पलता राजाराम दिघे, निरीक्षक सुनील शंकर शिंदे, सुवर्णा उमेश शिंदे, पोलीस उपअधीक्षक अनंत ज्ञानेश्वर माळी, निरीक्षक महेंद्र दत्तात्रय कोरे, कैलाश रामजी बाराभाई, उपनिरीक्षक विजय गोपाळ मोहिते, इन्स्पेक्टर भारत रावसाहेब सावंत, सहाय्यक उपनिरीक्षक नरेंद्र सखाराम राऊत, (पान २ वर)

➤ **जळगाव – शहरातील रामानंदनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक संजय एकनाथ शेलार यांना २०२६ चे मानाचे मराष्ट्रपती पोलीस पदकफ जाहीर झाले आहे.**



**त्यामुळे जळगाव पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पीएसआय शेलार यांनी पोलीस दलात ३५ वर्षे सेवा पूर्ण केली असून या काळात त्यांना त्यांच्या उत्तम कामगिरीबद्दल तब्बल २४२ बक्षीसे मिळाली आहेत. त्यांना राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांकडून अभिनंदन होत आहे.**

### कॅप्टन शुभांशू शुक्ला यांना अशोक चक्र जाहीर



वृत्तसंस्था । नवी दिल्ली

भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी आतंरराष्ट्रीय अवकाश केंद्राला भेट दिली होती. या दरम्यान अवकाश संशोधन केंद्रात त्यांनी केलेल्या कार्याचा सन्मान म्हणून भारत सरकारकडून अशोक चक्र जाहीर करण्यात आलं आहे. शांतता काळातील सर्वोच्च सैन्य सन्मान पुरस्कार अशोक चक्र शुभांशू शुक्ला यांना जाहीर झालं आहे.

## संपादकीय

### गफलतीचे धोरण

पुढच्या महिन्यात टी-२० विश्वचषक स्पर्धा आहे. भारत आणि श्रीलंका यांच्याकडे स्पर्धेचे संयुक्त यजमान पद आहे. एकट्याने स्पर्धा आयोजित करण्याची क्षमता भारताकडे आहे, तरीही श्रीलंका संयुक्त यजमान आहे. केवळ क्रिकेटच्या अनुशंगाने या निर्णयाकडे बघता येऊ शकत नाही. त्याला शेजारी देशाशी सौहार्दपूर्ण संबंधाची किनार आहे. श्रीलंकेबाबत हा उदार दृष्टिकोन स्वागतार्ह आहे. गोटाबाया घराण्याची राजवट तेथे होती तेव्हा अशी स्थिती नव्हती, ती आता झाली आहे ही चांगली गोष्ट. अशीच भूमिका आपल्याला बांगलादेशच्या संदर्भात का दाखवता आली नाही, हा प्रश्नही आहे. विश्वचषक स्पर्धेचे भारतातील सामने न खेळण्याचा निर्णय बांगलादेशने घेतला. त्यात माघार घेतली जाणार नाही अशी आडमुठी भूमिकाही त्यांनी घेतली आहे. प्रकरण या थराला जाण्यास काही बाबी कारणीभूत आहेत. त्यातील सगळ्यात महत्त्वाचे बांगलादेशातील राजकीय अस्थैर्य. शेख हसीना वाजेद यांच्या राजवटीविरोधात तेथे बंड घडवून आणले गेले. त्याला वर्ष झाले. तेव्हापासून हसीना भारत मुक्कामी आहेत. हसीना यांच्या विरोधात बांगलादेशातील जनमत प्रक्षुब्ध आहे व राजकीय स्वार्थासाठी तेथील त्यांच्या विरोधकांनी शस्त्र म्हणून याचा वापर केला. शेजारच्या देशात काही घडामोडी घडत असल्या, तर ती अंतर्गत बाब असली तरी तशी ती नसते. त्याकडे दुर्लक्ष करताही येत नाही. याचा अर्थ आपण तेथे थेट हस्तक्षेप करावा असे नाही, मात्र घटना अथवा घटनांची मालिका आपल्याला फार अडचणीकडे ढकलणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. परराष्ट्र संबंधांच्या दृष्टीने ही पहिली अट असते कारण शेजारी बदलता येत नाही. हसीना विरोधकांनी जे विष ओकले त्याची झळ भारताला थेट पोहोचली नसली तरी तेथे राहणार्या भारतीय वंशाच्या नागरिकांना (हिंदू धर्मीय) पोहोचली. त्यांची घरे, दुकाने जाळली गेली, महिलांना त्रास दिला गेला. बांगलादेशात राजकीय नसलेल्या व्यक्तीचे काळजीवाहू सरकार स्थापन झाले. त्यांनी शहाणपणाने स्थिती नियंत्रणात आणणे अपेक्षित होते. ते त्यांना जमले नाही किंवा जमवून घ्यायचे नव्हते. त्यामुळेच एकीकडे निवडणुकांची घोषणा करताना, स्थैर्याचा पुकारा करताना देशातील अल्पसंख्याकांना व विशेषत: हिंदूंना पद्धतशीर लक्ष्य केले गेले. हा राग अर्थात हसीना यांना आश्रय देणार्या भारतावरचा होता. तो निर्माण केला गेला होता, चिथावणी दिली गेली होती व त्याला खतपाणी घातले गेले. भारतात या घटनांचे पडसाद उमटणे स्वाभाविक होते आणि तसे ते उमटलेही. भारतात आयपीएल नावाची आपल्या श्रीमंत क्रिकेट नियामक मंडळाकडून एक अतिश्रीमंतांमार्फत चालवलेली स्पर्धा घेतली जाते. यातील कोलकात्याचा संघ चित्रपट अभिनेता शाहरूख खान याच्या संयुक्त मालकीचा आहे.

# आधुनिक कृषी तंत्रज्ञान नव्या भारताच्या विकासाचा मार्ग

## मध्यप्रदेशचे हॉर्टिकल्चर मंत्री नारायन सिंह कुशवाह यांचे प्रतिपादन; सायन्स टेकवर्क कृषी महोत्सवाला दिली भेट

प्रतिनिधी । जळगाव

**कमी श्रमात, कमी जागेत, कमी पाण्यात शेतकर्‍यांचे उत्पन्न वाढले पाहिजे, यासाठी ठिबक, स्प्रिंकलर, ऑटोमेशन, प्रिसीजींग फार्मिंग, अतिसघन फळबागांची लागवड करून प्रक्रिया उद्योगांवर भर दिला पाहिजे. याच्या अवलंबनातूनच शेतकर्‍यांचे उत्पन्न दुप्पट होईल तसेच ग्रामीणस्तरावर रोजगार वाढेल. परिणामी स्थलांतर थांबू शकेल. त्यासाठी तरूणांनी आपल्याकडील ज्ञानाचा उपयोग हा शेतीमध्ये असलेले अत्याधुनिक तंत्रज्ञान समजून घेण्यासाठी केला पाहिजे, ते प्रत्यक्ष जीवनात उतरविले तर आर्थिकदृष्ट्या सामाजिक परिवर्तन घडेल, यासाठी जैन इरिगेशनच्या जैन हिल्स येथील कृषी संशोधन प्रात्यक्षिक केंद्रावर सुरू असलेल्या ‘सायन्स टेकवर्क’ या हायटेक शेतीच्या नव्या हुंकार कृषी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन करीत नव्या भारताच्या विकासाचा राजमार्ग यात असल्याचे प्रतिपादन मध्यप्रदेशचे सामाजिक न्याय आणि दिव्यांगजन कल्याण, उद्यानिकी तथा खाद्य प्रसंस्करणमंत्री नारायण सिंह कुशवाह यांनी प्रतिपादन केले.**

जैन हिल्स येथे सुरू असलेल्या कृषी महोत्सवाला मंत्री नारायण सिंह कुशवाह यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी त्यांनी जैन इरिगेशनचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अनिल ढाके, डॉ. के.बी. पाटील, डॉ.बी.के. यादव, डॉ.अनिल पाटील, विवेक डांगरीकर, गिरीष कुलकर्णी आणि शास्त्रज्ञांशी त्यांनी संवाद साधला. यावेळी दिल्लीच्या ॲग्री इंडस्ट्रीज विकास चेंबर्स व्यवस्थापकीय संचालक मनोज गुप्ता, मध्यप्रदेशचे भाजपा महामंत्री राघवेंद्र यादव, अरविंद सोनगिरकर, रामविजय यादव आदी उपस्थित होते.

यावेळी त्यांनी जैन ऑटोमेशन, स्मार्ट फिल्टर, न्यूट्रीकेअर, एचडीपीई पाईपसह फिटिंग्जस मधील सर्व उत्पादनांची माहिती त्यांनी घेतली. जैन स्प्रिंकलरचा प्रत्यक्ष शेतातील उपयोग समजून घेतला. क्षारपड जमिनीच्या सुधारणेसाठी जैन सबसरफेस ड्रेनेज सिस्टीमचे तंत्र, शेतीमध्ये परिवर्तन आणणारे आणि भविष्य घडविणारे जैन क्लायमेंट स्मार्ट टेक्नॉलाजी समजून घेतले. ‘सेवन इन डबलिंग’मध्ये ऊसासह अन्य पिकांचे उत्पन्न कसे वाढविता येते याची प्रत्यक्ष माहिती घेतली. फळबागांसाठी अतिसघन लागवड पद्धत हे नवीन तंत्रज्ञान किती व कसे प्रभावी आहे, यावर शास्त्रज्ञांशी संवाद साधला. जैन इरिगेशनद्वारे राबविण्यात येणाऱ्या सौर कृषी पंप, टिश्यूकल्चर रोपे व फलोत्पादनाच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास साध्य होत असल्याचे मंत्री नारायण सिंह कुशवाह यांनी प्रत्यक्ष पाहिले.

### ● ३० जानेवारीपर्यंत चालणार महोत्सव

**हायटेक शेतीच्या नव्या हुंकार कृषी महोत्सवाला शेतकऱ्यांकडून मिळणाऱ्या प्रचंड प्रतिसादामुळे हा महोत्सव १४ जानेवारीऐवजी आता ३० जानेवारीपर्यंत वाढविण्यात आलेला आहे. महोत्सवात सर्व शेतीविषयक आधुनिक प्रयोग शेतकरी, अभ्यासकांना पाहता येण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.**



मध्यप्रदेशात या कार्याला प्राधान्यक्रम देऊन काही नवीन उपक्रम राबविता येऊ शकतात का, यासाठी हा खास दौरा आयोजित करण्यात आला होता. फ्युचर फार्मिंग, फळप्रकिया उद्योग, जैन फूडपार्क, जैन हायटेक प्लांट फॅक्टरी टाकरखेडा, जैन प्लास्टिक पार्क या प्रकल्पांची पाहणी करून माहिती घेतली.

मातीविरहीत रोगमुक्त रोपं जी नियंत्रतीत वातावरणातील मातृवृक्षांपासून तयार केली जातात त्याचीही माहिती त्यांनी यावेळी घेतली. यावेळी त्यांनी सिक्किमचे विद्यार्थी तसेच राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांशी संवाद देखील साधला.

### ➤ आधुनिक कृषितंत्रज्ञान शेतकऱ्यांना उपयुक्त

**मध्यप्रदेशात जैन इरिगेशनचे आधुनिक कृषी तंत्रज्ञान उपयोगात आणले जात आहे. सूक्ष्मसिंचन, ठिबक सिंचन व स्प्रिंकलर प्रणाली भाजी-पाला बटाटा, मिरची, फलोत्पादन टिश्यूकल्चर केळी रोपे, कांदा, आंबा, मोसंबी यात व्यापक प्रमाणात उपयोग होतो. त्यासाठी मध्यप्रदेश शासनाच्या विविध योजना देखील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध आहेत. यामुळे शेतकऱ्यांना पाणी बचत, उत्पादनवाढ व गुणवत्तापूर्ण पीक घेण्यास मदत झाली आहे. कृषी क्षेत्रातील नवकल्पना, शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषी विकासाला नवे बळ प्राप्त झाले. राज्यातील कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास व आधुनिकतेसाठी जैन इरिगेशनचे योगदान महत्त्वपूर्ण ठरत आहे. शास्त्रोक्तपद्धतीने लागवड केलेल्या गहू, भात, मका, फळबाग, भाजीपाला पिके यासह अन्य पिकांची विज्ञान व तंत्रज्ञान यांची जोड देत जैन हिल्सवर प्रात्यक्षिके उभी आहेत. याचा वापर करुन शेतकरी आपल्या शेतीतील उत्पन्न वाढीसाठी फायदा घेऊ शकतात. असेही मंत्री नारायण सिंह कुशवाह यावेळी म्हणाले.**

## पान १ वरुन

**पद्म पुरस्कारांची घोषणा; ......**

केटी थॉमसन यांना देखील पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे, सार्वजनिक व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. एन राजम यांना त्यांच्या कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मविभूषण पुरस्काराने गैरवण्यात येणार आहे. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल पी नारायण यांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. व्ही.एस. अच्युतानंदन यांना मरणोत्तर पद्मविभूष पुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार्थींमध्ये यांचा आहे समावेश- गायिका अलका याज्ञिक, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, कल्लीपट्टी रामासामी पलानीस्वामी, मामूट्टी, डॉ.नोरी दत्तात्रेयडू, पियुष पांडे, एस.के.एम. मैलानंदन, शतावधानी आर.गणेश, उदय कोटक, व्ही.के. मल्होत्रा, वेल्लापल्ली नटेसन, विजय अमृतराज, शिबू सोरेन यांचा पद्मभूषण तर भिकल्या लाडक्या धिंडा (महाराष्ट्र), ब्रिजलाल भट्ट (जम्मू आणि काश्मीर), चरण हेमब्रम (ओडिशा), चिरंजी लाल यादव (उत्तर प्रदेश), डॉ. पद्मा गुरमेट (जम्मू आणि काश्मीर), कोल्लक्काइल देवकी अम्माजी (केरळ), महेंद्रकुमार मिश्रा (ओडिशा), नरेशचंद्र देव वर्मा (त्रिपुरा), ओथुवर तिरुथनी (तामिळनाडू), रघुपत सिंग (उत्तर प्रदेश), रघुवीर खेडकर (महाराष्ट्र), राजस्थानपती कलिअप्पा गौंडर (तामिळनाडू), सांग्युसांग एस. पोंगेनर (नागालँड), श्रीरंग देवबा लाड (महाराष्ट्र), तिरुवरूर बख्तवासलम (तामिळनाडू), अंके गौडा (कर्नाटक), आर्मिडा फर्नांडिस (महाराष्ट्र), डॉ. श्याम सुंदर (उत्तर प्रदेश), गफ्फारुद्दीन मेवाती (राजस्थान), खेमराज सुंदरियाल (हरियाणा), मीर हाजीभाई कासंबाई (गुजरात), मोहन नगर (मध्य प्रदेश), नीलेश मांडलेवाला (गुजरात), आर अँड एस गोडबोले (छत्तीसगड), राम रेड्डी मामिदी (तेलंगणा), सिमांचल पात्रो (ओडिशा), सुरेश हनगवाडी (कर्नाटक), तेची गुबिन (अरुणाचल प्रदेश), युनाम जात्रा सिंग (मणिपूर), बुधरी थाठी (छत्तीसगड), डॉ. कुमारसामी थंगराज (तेलंगणा), डॉ. पुननियामूर्ती नटेसन (तामिळनाडू), हेले वॉर (मेघालय), इंद्रजित सिंग सिद्धू (चंदीगड), के. पंजनिवेल (पुडुचेरी), कैलास चंद्र पंत (मध्यप्रदेश), नुरुद्दीन अहमद (आसाम), पोकिला लेकटेपी (आसाम), आर. कृष्णन (तामिळनाडू), एस जी सुशीलम्मा (कर्नाटक), तागाराम भील (राजस्थान), विश्व बंधू (बिहार), धर्मिकलाल चुनीलाल पंड्या (गुजरात), शफी शौक (जम्मू आणि काश्मीर), भगवानदास रायकर (मध्यप्रदेश) यांचा पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे

**विविध क्षेत्रातील कामगिरीसाठी......**

उपनिरीक्षक सतीश जनार्दन निंबाळकर, सहाय्यक उपनिरीक्षक अफजल खान शहेजादे खान पठाण, सहाय्यक उपनिरीक्षक प्रदिप साहेबराव सावंत, उपनिरीक्षक सुभाष वामन साळवी, निरीक्षक प्रमोद रोहिदास वाघमारे, उपनिरीक्षक विजयकुमार शंकर शिंदे, विक्रम व्यंकटराव नवरखेडे, विजय प्रभाकर देवरे, मनोज यशवंत गुजर, अजय मनोहर सावंत, गंगाधर रामचंद्र घुमरे, संजय एकनाथ शेलार, निरीक्षक महादेव मधुकर खंडारे, उपनिरीक्षक राजकुमार चनवीरप्पा टोळनुरे, बाबासाहेब नाथा ढाकणे, शिवदास दत्तात्रय फुटाणे, सुरेश साहेबराव सोनवणे, अग्निशमन सेवासाठी पदक जाहीर झालेल्यांमध्ये उपमुख्य अग्निशमन अधिकारी हरिश्चंद्र वसंत गिरकर, अग्निशमन अधिकारी दामोदर वनगड, ड्रायव्हर ऑपरेटर कांचन बंडू पाटील, अग्रगण्य फायरमन काशिनाथ राजनाथ मिश्रा, नागरी संरक्षण व होमगार्डसाठी पदक जाहीर झालेल्यांमध्ये प्लाटून कमांडर गंगाधर वखाजी बुरकुड, राजेंद्र मधुकरराव बन्सोड, नागेश्वरराव अल्कोंदिया पोडदाली, सुधारात्मक सेवासाठी अधीक्षक अशोक शिवराम करकर, अतिरिक्त अधीक्षक गोविंद केशव राठोड, हवालदार राजेंद्र भाऊसाहेब धनगर, सुनील भाऊसो लांडे, प्रल्हाद महिपती शिंदे आदींचा समावेश आहे.

**ठाकरे गटाचे माजी आमदार......**

लढवली होती, हा ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. दिवंगत नेते विलासराव देशमुख राज्याचे मुख्यमंत्री असताना काँग्रेसचा मजबूत प्रभाव असलेल्या औसा विधानसभेची जागा शिवसेनेकडे खेचून आणण्याचे काम दिनकर माने यांनी केले होते, तेही सलग दोन वेळा. तेच आता भाजपामध्ये प्रवेश करणार आहेत. लातूर जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी त्यांनी मोठे कार्य केले होते. त्यामुळे जिल्ह्यातील शिवसेनेचे ज्येष्ठ आणि विश्वासार्ह नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. दिवंगत विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना जिल्ह्यात शिवसेना सक्षमपणे उभी करण्याचे काम आम्ही केले. मात्र, पुढील काळात शिवसेनेच्या वरिष्ठ नेतृत्वाचे लातूर जिल्ह्यावर लक्ष नव्हते. संघटनात्मक पातळीवर शिवसेना कमजोर होत गेली. शिवसैनकांची कामे वेळेवर होत नाहीत, या सर्व कारणामुळे राज्याचे सक्षम नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सर्वसामान्यांसठी काम करावे यासाठी भाजपात पक्षप्रवेश करत असल्याचे माने यांनी म्हटले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तोंडावर झालेला हा पक्षप्रवेश औसा तालुक्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण लातूर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलणारा ठरण्याची चिन्हे आहेत. कारण, दिनकर माने यांच्यासोबत मोठ्या संख्येने कार्यकर्ते भाजपात प्रवेश करणार आहेत.

**नर्सिंग सीईटीचे वेळापत्रक......**

हजार ५०१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, तर डीपीएन व पीएचएन या पदविकांसाठी ४७७ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यामुळे यंदाही नोंदणीसाठी महिनाभराचा कालावधी दिला आहे. नर्सिंगसोबतच राज्यामध्ये इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नोंदणी प्रक्रियेनेही वेग घेतला आहे. सध्या एमएचटी-सीईटी, एमबीए, एमसीए, ३ व ५ वर्षीय एलएलबी, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., तसेच बीसीए, बीबीए आणि बी.डिझाइन यांसारख्या विविध अभ्यासक्रमांची नोंदणी आधीच सुरू झाली आहे. यातील फाइन आर्ट्स या अभ्यासक्रमाच्या नोंदणीलाही लवकरच सुरुवात होणार असल्याचे सीईटी कक्षाने स्पष्ट केले आहे. या सर्व परीक्षांचे वेळापत्रक, ऑनलाइन अर्जाचा नमुना आणि सविस्तर माहिती पुस्तिका राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली असून, विद्यार्थ्यांनी वेळेत आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

# कलावंत रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याने होतोय अभिनंदनाचा वर्षाव

प्रतिनिधी । चोपडा



**राज्यातील लोकप्रिय तमाशा कलावंत कलाभुषण रघुवीर खेडकर यांना भारत सरकारतर्फे पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

श्री. खेडकर यांचे मानस बंधु प्रकाश रजाळे यांनी, खेडकर खान्देशातील नामवंत तमाशा कलावंत असून उत्कृष्ट अभिनयाने अख्ख्या महाराष्ट्रात रसिकांना भुरळ घातली आहे. खान्देशात त्यांचा मोठा मित्र परिवार असून त्यांचे नाव प्रत्येकाच्या ओठावर असते. त्यांच्या तमाशा नाट्य कार्यक्रम असला म्हणजे बरेचशी गावे उलथून पालथून कार्यक्रमाला जोमाने हजेरी लावतात. त्यामुळे प्रत्येक गावात यात्रेला रंगतदार कलेच्या मेजवानीची जोड लाभल्याने जनतेच्या आनंदाला उधाण येते. अशा उत्कृष्ट कलाकारांच्या कलेची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कार याआधीही दिले आहेत. याआधीही सांस्कृतिक मंत्री संजय देवतळे यांच्याहस्ते पुरस्कार देऊन त्यांच्या सन्मान झाला आहे. त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल तमाशा रसिकांना आनंद झाला असल्याचे सांगितले. या पुरस्काराबद्दल श्री. खेडकर यांचे मानस बंधु प्रकाश रजाळे, सतिश बापु, सजय पाटील, विजय पाटील, पंकज पाटील, डॉ.गणेश पटेल, दिलीप देसले, प्रल्हाद पाटील, शैलेंद्र सोनजे, सौरभ अमृतकार, सागर चौधरी, रमाकांत बोरसे, प्रवीण कोळी, देवीलाल बाविस्कर, प्रदीप शहा, अतुल पाटील आदींनी अभिनंदन केले आहे.

### आमचाही आनंद द्विगुणीत

उत्कृष्ट कलावंत रघुवीर खेडकर यांचा व माझा संबंध सन १९८० मध्ये माहिजी येथील यात्रेत आला. त्यांच्या उत्कृष्ट अभियानाने मी भारावलो व त्यांच्याशी मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित झाले. त्यानंतर त्यांचा वाढदिवस सन १९८५ मध्ये मी स्वतः चोपडा येथे जोरदारपणे साजरा केला. तेव्हापासून एक मायेचे जाळे आमच्यात विणले गेले अन् सर्वच लोक ते प्रकाश रजाळे मावस भाऊ असल्याची एक नवीन ओळख मिळाली. त्यानंतर त्यांच्या कार्यक्रमाला जाण्यासाठी पाय नकळत वळू लागले. अशा कलाकारास केंद्र शासनामार्फत पुरस्कार मिळाल्याने आमचाही आनंद द्विगुणीत झाला आहे.

**- प्रकाश रजाळे,**
घोडगाव

### प्रजासत्ताक दिनानिमित्त भाजपा कार्यालयात ध्वजारोहन

प्रतिनिधी । जळगाव

प्रजासत्ताक दिनानिमित्त दि. २६ रोजी भाजपा कार्यालयात स. ८ वा. भाजपा कार्यालय जी.एम.फौंडेशन व ८:१५ वाजता वसंत स्मृती कार्यालय, बळीराम पेठ येथे ध्वजारोहन करण्यात येणार असून आ.सुरेश भोळे (राजू मामा), महानगर जिल्हाध्यक्ष दिपक सूर्यवंशी यांच्या उपस्थित कार्यक्रम होणार असून सर्व भा.ज.पा. जिल्हा महानगरचे सर्व प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, जिल्हा मोर्चा/आघाडी/प्रकोष्ठ पदाधिकारी, सर्व नवनिर्वाचित भाजपा नगरसेवक, मंडल अध्यक्ष, मंडल पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते यांना उपस्थित राहण्याचे कळविण्यात आले आहे.

# गौरी सोनार ठरली मिस ब्युफाची मानकरी



प्रतिनिधी । जळगाव

**येथील डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात ‘जल्लोष’ स्नेहसंमेलननिमित्त विद्यार्थिनींसाठी ‘ब्युफा पेजंट फॅशन-शो’चे आयोजन करण्यात आले होते. यात गौरी सोनार ‘मिस ब्युफा’ची मानकरी ठरली.**

तिला लेवा एज्युकेशनल युनियनचे खजिनदार किरण बेंडाळे यांच्याहस्ते मुकुट व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.व्ही.जे. पाटील, उपप्राचार्य डॉ.पी.एन. तायडे, उपप्राचार्य डॉ.सत्यजित साळवे, उपप्राचार्य सुनिता पाटील, परीक्षक जान्हवी परसवाणी, सुनैना पाटील आदी उपस्थित होते. या फॅशन-शोमध्ये पहिली रनर अप मॉडेल म्हणून स्मृती रवींद्र सौदे तर दुसरी रनर-अप मॉडेल म्हणून स्नेहा संजय अहिरे हिने बक्षीस मिळवले. बेस्ट वॉक म्हणून देशना अजित जैन हिला व बेस्ट एटीट्यूड म्हणून प्रार्थना महेश गायकवाड तर बेस्ट चाइल्ड मॉडेल म्हणून अंकिता अमरजीत साळुंखे व बुरहानुद्दीन अब्दुल कादर नागरी हिला सन्मानित करण्यात आले. यात सहभागी स्पर्धकांनी विविध प्रकारचे पेहराव व मेकअप करून रॅम्प वॉकद्वारे टाइनी टॉईज, सुमंगली, फॅशन विथ फ्युचर, वेस्टर्न मेकअप, चेंज ओव्हर, वेडिंग वियर्स या थीम्स सादर केल्या. सहभागी मॉडेलचा शृंगार व पेहेराव जागृती बगाडे, महेश्वरी लाड, अनुजा राजू करे, रोहिणी सुरवाडकर, हर्षा दहिभाते, निकिता अशोक चौधरी यांनी केला. कौशल्य विकास प्रशाळेअंतर्गत ब्युटी थेरपी व फॅशन डिझायनिंग विभागातील विद्यार्थ्यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# प्रताप विद्या मंदिरात आयोजित कार्यशाळेत शास्त्रीय संगीतावर मार्गदर्शन



प्रतिनिधी । चोपडा

**स्पीक मॅके संस्था, चोपडा एज्युकेशन सोसायटी संचलित प्रताप विद्या मंदिर संगीत कलादालन व पी.व्हि. एम.इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध सारंगी वादक उस्ताद फारूक लतीफ खान यांची एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत उपस्थितांना शास्त्रीय संगीतावर मार्गदर्शन करण्यात आले.**

यावेळी मार्गदर्शन करतांना उस्ताद फारूक लतीफ खान यांनी, सारंगी हे एक भारतीय तंतुवाद्य (तार वाद्य) आहे, जे मुख्यत्वे उत्तर भारतीय संगीतात वापरले जाते. ज्यात गजाच्या म्हणजेच धनुष्याच्या साहाय्याने तारा वाजवून कर्णमधुर स्वर काढला जातो.

एकाच लाकडी तुकड्यापासून बनवलेले असते आणि त्याला भारतीय लोकसंगीत व शास्त्रीय संगीतात महत्त्वाचे स्थान आहे, असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना देखील त्यांनी उत्तरे दिली. याप्रसंगी संस्थेच्या सचिव माधुरी मयूर, समन्वयक गोविंद गुजराथी, तबलावादक शोन पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्पीक मॅके संस्थेच्या पदाधिकारी सभ्यसाची डे, संगीत शिक्षक पी.बी. कोळी, मुख्याध्यापक रजीश बालन, उपमुख्याध्यापिका निखिला मॅम, रवींद्र राजपूत व समाधान माळी आदींनी परिश्रम घेतले.

कार्यशाळेला शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, गावातील संगीत प्रेमी रसिक श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतना मॅडम, ज्योती मॅडम यांनी केले. फलक लेखन मनीषा मॅडम यांनी केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन द्यावे : खा. डॉ. बच्छाव

### दिशा समितीच्या बैठकीत केंद्र सरकार पुरस्कृत योजनांचा घेतला आढावा

प्रतिनिधी । धुळे



**जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीकडे वळावे यासाठी त्यांना प्रोत्साहन देत मार्गदर्शन करावे, असे निर्देश खा. डॉ. शोभा बच्छाव यांनी जिल्हा विकास व सनियंत्रण समितीची (दिशा) बैठकीत दिले.**

जिल्हा विकास व सनियंत्रण समितीची (दिशा) बैठक जिल्हा परिषदेच्या स्व. यशवंतराव चव्हाण सभागृहात झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी खा. अॅड. गोवाल पाडवी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस, उपवनसरंक्षक मोहन नाईकवाडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र इंगळे, जिल्हा विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, दिशा समितीचे सदस्य सुनील शिंदे, भाईदास नगराळे, हेमांगी सनेर आदी उपस्थित होते.

खा. डॉ. बच्छाव म्हणाल्या की, नैसर्गिक शेतीमुळे उत्पादन खर्चात घट होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढते. तसेच जमिनीची सुपीकता टिकून राहते. पर्यावरणपूरक शेती पद्धतीचा अवलंब केल्यास शाश्वत शेतीचा मार्ग खुला होईल, यासाठी कृषी विभाग, कृषी विज्ञान केंद्र व संबंधित यंत्रणांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे, वन विभागात विकास कामे करताना वनविभागाची पूर्वपरवानगी घ्यावी, ई नाम ग्राम योजनेतंर्गत सर्व बाजार समितीचे व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करावेत, महानगरपालिकेने अमृत २ ची कामे पूर्ण करावीत, पांझरा नंदी स्वच्छ करण्यासाठी मोहीम राबवावी, जिल्ह्यातील उर्वरीत अंगणवाडीचे डिजिटलायझेशन करावे, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची मंजूर कामे दर्जेदार करावीत, किसान कॉल सेंटर मार्फत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. पाणलोट क्षेत्र योजनेत धुळे जिल्ह्याचा समावेशासाठी प्रस्ताव सादर करावा, जल जीवन मिशन योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवावी. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देत त्यांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध करुन द्यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

खा. अॅड. गोवाल पाडवील यांनी साक्री व शिरपूर तालुक्यातील जनजीवन मिशनचे कामे प्राधान्याने पुर्ण करावी, जुन्या प्रस्तावासाठी निधी मागणीचे प्रस्ताव सादर करावेत, शबरी आवास योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ द्यावा, आदिवासी विकास विभागाने केंद्रीय योजनेतून सुरु असलेल्या योजनांची माहिती द्यावी, रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांना मंजुरीची रक्कम वेळेत वितरीत करावी, शिरपूर येथील बसस्थानक दुरुस्तीसाठी प्रस्ताव सादर करावा, संजय गांधी निराधार योजनेची तालुकास्तरावर समिती स्थापन करण्याच्या सुचना यावेळी दिल्या.

यावेळी प्रधानमंत्री फसल विमा योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन, एकात्मिक बाल विकास, प्रधानमंत्री मातृ वंदना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास, डिजिटल इंडिया, पायाभूत सुविधांशी संबंधित दूरसंचार, रेल्वे, महामार्ग, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण आदी विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत समितीच्या अशासकीय सदस्यांनीही विविध सूचना केल्या. यावेळी विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

## लोकशाही बळकट करण्यासाठी युवकांनी पुढे यावे : तहसीलदार जाधव




प्रतिनिधी । नवापूर

**युवकांनी निवडणूक प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, मतदान करणे ही लोकशाही मजबूत करण्याची सर्वात प्रभावी पद्धत असल्याचे प्रतिपादन तहसीलदार दत्तात्रय जाधव यांनी केले.**

आदिवासी सेवा सहायक व शिक्षण प्रसारक संस्था संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार दत्तात्रय जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील, गट विकास अधिकारी देविदास देवरे, नायब तहसीलदार भक्तराज सोनवणे, विस्तार अधिकारी चौरे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार मिलिंद निकम, प्राचार्य डॉ. डी.पी. जयस्वाल, उपप्राचार्य अनिल पाटील, डॉ.एस.बी. बनसोडे, डॉ.आय. जी. पठाण, डॉ.एस.आर. बोरसे, डॉ. छाया गावित आदी उपस्थित होते.

यावेळी विस्तार अधिकारी रमेश चौरे यांनी, राष्ट्रीय मतदार दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.पी. जयस्वाल यांनी, सर्व नागरिकांनी मतदान करणे आवश्यक असून मतदानाची टक्केवारी वाढवणे ही लोकशाहीच्या यशासाठी गरजेची बाब असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नोडल अधिकारी व राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. ई. एस. गेडाम यांनी केले. त्यांनी यावर्षीची थीम माय इंडिया, माय व्होट असल्याचे सांगून अधिकाधिक मतदानासाठी जनजागृती करण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.एस. बोरदे यांनी मतदार प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आनंद पाटील यांनी केले तर आभार डॉ. वसईकर यांनी मानले.

### वक्तृत्व, निबंध, रांगोळी स्पर्धेतून जनजागृती...

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयात वक्तृत्व, निबंध व रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेत पायल चव्हाण, अजय शिपा वसावे, दर्शिल विजय चौधरी, निबंध स्पर्धेत तेजल रणजीत गावित, निर्जला सुंदर वसावे, सोहम दिलीप वसावे, रांगोळी स्पर्धेत वैभवी चव्हाण, भूमिका मराठे, चांदणी मोराणकर यांनी यश मिळवले. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. तिनही स्पर्धेतून मतदानावर जनजागृती करण्यात आली.

## थोडक्यात

### रस्ता डांबरीकरण कामाचे भुमिपूजन

**नंदुरबार ।** शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील रस्ता डांबरीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख अॅड. राम रघुवंशी यांच्याहस्ते करण्यात आले. रस्ता डांबरीकरणामुळे परिसरातील नागरिकांची सोय होणार आहे. नंदुरबार नगरपरिषदेचा माध्यमातून दादावाडी समोरील पी.के. अण्णा पाटील बँकेपासून जैन मंदिर तसेच महावीर कॉलनी मधील रस्ता डांबरीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख अॅड. राम रघुवंशी यांच्या हस्ते करण्यात आले.

### ई–कचऱ्यावर ठाकरे विद्यालयात जनजागृती

**नंदुरबार ।** तालुक्यातील शेजवा येथील बाळासाहेब ठाकरे माध्यमिक विद्यालयातर्फे रॅली काढून ई–कचरा संकलन करुन जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक दत्तू पाटील हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या घरातील ई–कचरा म्हणजे काय? त्याचे विघटन न केल्यास त्याचे दुष्परिणाम तसेच ई–कचरामुळे पर्यावरणाचे असंतुलन कसे होतो. त्याच्या पुनर्वापर कसा करता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी उपशिक्षक विजय पवार, दीपक वळवी, रामानंद बागले संजय बोरसे, हरुणखाँ शिकलीगर, आनंदराव पवार, संदीप गायकवाड, संगीता गोखले आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी शिपाई संजय वसावे, दिनेश पवार आदींनी परिश्रम घेतले. रॅलीदरम्यान, विद्यार्थ्यांनी ई–कचरा म्हणजेच इलेक्ट्रॉनिक बंद पडलेल्या किंवा चालू स्थितीत पण न वापरत असलेल्या वस्तूचे संकलन करण्याचे आवाहन केले.

### हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात साजरा

**तळोदा ।** येथील नेमसुशिल समूहात हळदीकुंकू सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी सोनाबेन तुरखिया हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका अनिता परदेशी, प्रतिक्षा दुबे, मोनिका सुरज महाजन, गायत्री क्षत्रिय, सखी कुवरबेन पटेल, नलिनी शाह, रूपल वाणी आदी उपस्थित होत्या. यावेळी दिपाली देवरे यांनी भोगी सणांच्या विविध वस्तूंचे विविध मांडणी करून देखावा सादर केला. विविध उखाणे, गाणे, ओव्या म्हटल्या. महिलांना संस्थेमार्फत बक्षिसे देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मोहिनी धनगर यांनी आपल्या मनोगतातून शाळेची शिस्त, नियम दर्जेदार शिक्षणाबद्दल कौतुक केले. मुख्याध्यापिका पुष्पा बागुल, भावना डोंगरे, कल्याणी वडाळकर, अर्चना पाडवी, मनीषा पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्रजासत्ताकदिनी विद्यार्थ्यांचे सामूहिक कवायत संचलन

प्रतिनिधी । धुळे

**जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन कार्यक्रमाचे आयोजन सकाळी ८.३० वाजता करण्यात आले असून चाळीसगाव रोडवरील कनोसा कॉन्व्हेंट हायस्कुल व चिप्ट आर.आर नूतन पाडवी हायस्कुल येथे येथे या कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती शिक्षणाधिकारी मनिष पवार यांनी दिली.**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या माध्यमातून व शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. माध्यमिक शिक्षण विभागाच्या नियोजनानुसार जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व शिक्षण मंडळाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील चार लाख ३१ हजार विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. यासाठी शिक्षण संचालनालयाकडून देशभक्तीपर गीतांवरील सामूहीक कवायतीच्या १४.४० मिनिटांच्या मार्गदर्शक व्हिडीओ नुसार विद्यार्थ्यांचा सराव करुन घेण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी सैनिकी विद्यालय, मोराणे (प्र. नेर) येथे चार शाळामधील एक हजार ४०० विद्यार्थी सहभागी होणार आहे. साक्री तालुका न्यू इग्लिश स्कूल, साक्री येथे तीन शाळा सहभागी होणार आहे. शिरपूर आर.सी.पी. येथे चार शाळामधील सात हजार ९३४ विद्यार्थी, पी.बी.एम. म्युन्सिपल हायस्कूल, शिरपूर येथे तीन शाळामधील दोन हजार ६१५ विद्यार्थी सहभागी होणार आहे. शिंदखेडा तालुका हस्ती पब्लीक स्कूल, दोंडाईचा येथे कार्यक्रम होणार असून यात चार शाळामधील चार हजार विद्यार्थी तर धुळे शहरात श्री पिंपळादेवी माध्यमिक विद्यालय येथे सहा शाळामधील २ हजार ७०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. जिल्हास्तरीय कार्यक्रम २६ जानेवारी, रोजी कनोसा कॉन्व्हेंट हायस्कूल, चाळीसगाव रोड आणि चिप्ट. आर. आर. नूतन पाडवी हायस्कूल, स्टेशन रोड, धुळे येथे सकाळी ८.३० वाजता आयोजित केला जाईल. या ठिकाणी सुमारे पाच हजार विद्यार्थी एकत्र येऊन देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत संचलन करतील. कार्यक्रमासाठी ध्वनी यंत्रणा, स्पीकर्स, माईक, स्टेज, बैनर, ड्रोन व्हिडीओ व फोटो कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यासाठी वैद्यकीय सुविधा देखील उपलब्ध राहणार असल्याचेही यांनी यावेळी सांगितले.

## पालकमंत्री रावल यांच्याहस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी । धुळे

**भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ दि.२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता पोलीस कवायत मैदान येथे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्याहस्ते होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिली आहे.**

या दिवशी सकाळी ८.३० ते १० च्या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभ आयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३० च्या पूर्वी किंवा १० वाजेनंतर करावा तसेच मुख्य शासकीय समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विसपुते यांनी केले आहे.

## जी.टी.पी महाविद्यालयात रोजगार कौशल्य विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सांगता

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील जी.टी. पाटील कनिष्ठ व महाविद्यालयातील इंग्रजी विभागामार्फत तीन महिन्यांचा एम्प्लॉयबिलिटी स्किल्स अँड पब्लिक स्पिकिंग या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पार पडला.**

दैनंदिन अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये रोजगारक्षमता वाढविणे तसेच सार्वजनिक व्यासपीठावर आत्मविश्वासाने बोलण्याचे कौशल्य विकसित करणे या उद्देशाने या अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

तीन महिन्यांच्या कालावधीत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत चित्रफिती व पॉवर पॉईंट सादरीकरणाच्या माध्यमातून सैद्धांतिक व प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट, टाईम मॅनेजमेंट, अॅटिट्यूड डेव्हलपमेंट तसेच इंटरपर्सनल रिलेशनशिप यासारख्या रोजगारासाठी उपयुक्त विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

अभ्यासक्रमाची सांगता प्राचार्य प्रा.डॉ.एम.जे.रघुवंशी यांच्याहस्ते व माजी प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करून करण्यात आली. यावेळी डॉ.विश्वास पाटील यांनी विद्यार्थ्यांना आधुनिक जीवनातील कौशल्यांचा अंगीकार करून स्वतःची प्रगती साधावी, असा सल्ला दिला तर प्राचार्य डॉ. रघुवंशी यांनी अभ्यासक्रमादरम्यान आत्मसात केलेल्या रोजगार कौशल्यांचा दैनंदिन जीवनात प्रभावी वापर करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

यावेळी इंग्रजी विभागप्रमुख डॉ.डी. डी. गिरासे, डॉ.ए.डी. आखाडे व डॉ. डी.बी.देवरे उपस्थित होते. डॉ. विजय चौधरी यांनी अभ्यासक्रमादरम्यान मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी प्रा. सचिन आढावे व प्रा. राहुल मोरे यांनी सहकार्य केले.

## शिंदखेडा नगरपंचायतीच्या सर्व विषय समिती सभापतींची बिनविरोध निवड, भाजपाचे वर्चस्व

प्रतिनिधी । शिंदखेडा



**नगरपंचायतीच्या विविध विषय समित्यांच्या सभापतीसह सदस्यांची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. सर्व समित्यांच्या अपेक्षेप्रमाणे सभापतींची निवड बिनविरोध करण्यात आली असून यामुळे नगरपंचायतीत भारतीय जनता पार्टी गटाचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.**

नगरपंचायतीच्या महात्मा फुले सामाजिक सभागृहात पिठासन अधिकारी तथा तहसीलदार नितीनकुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि.२३ रोजी दुपारी १ वाजता ही निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी उपनगराध्यक्ष उदय देसले, मुख्याधिकारी श्रीकांत फागणेकर, प्रशासकीय अधिकारी सचिन वाघ, कर निरीक्षक गणेश पवार, विवेक डांगरीकर, विपुल साळुंखे आणि नगरसेवक–नगरसेविका उपस्थित होते. शिंदखेडा नगरपंचायतीच्या विषय समितींच्या सभापती निवडीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने नामनिर्देशन पत्र दाखल केले होते. परंतु छाननीत पुरेसे संख्याबळ नसल्याने सर्व अर्ज नामंजूर करण्यात आले. त्यामुळे भाजपाचे सभापती पदाच्या सर्व जागा बिनविरोध निवडून आल्या. सर्व सभापतींची निवड बिनविरोध झाल्याची अधिकृत घोषणा पिठासन अधिकारी नितीन कुमार देवरे यांनी केली.

### क्रीडा महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । शिरपूर

येथील आर.सी. पटेल इंग्लिश मीडीयम प्रि–प्रायमरी स्कूल येथे ड्युटी अॅण्ड ड्रीम्स या विविध क्षेत्रांत सेवा देणाऱ्या व्यक्तींच्या संबंधित विषयावर आधारित वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून डॉ.प्रदीप वाघ, सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्या स्मिता उगले, प्राचार्या मेघा मुंगसे, मुख्याध्यापक हेमंत देवरे, मुख्याध्यापिका मधुबाला राही उपस्थित होते. सूत्रसंचालन पल्लवी देसले, कांचन पवार यांनी केले.

## बोरद येथे आजपासून अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह

प्रतिनिधी । तळोदा

**तालुक्यातील बोरद गावाच्या परंपरेनुसार ज्येष्ठ मार्गदर्शकाचा मार्गदर्शनाने व तरूणांचा पुढाकाराने तसेच समस्त ग्रामस्थांच्यावतीने सोमवार, दि.२६ जानेवारीपासून अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह आयोजित करण्यात आला असून भक्ती, एकता आणि संस्काराच्या या सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

बोरद येथे सोमवार, दि.२६ रोजी अखंड हरिनाम किर्तन सप्ताह सुरू होणार असून दि.३० जानेवारी रोजी सांगता होणार आहे. सप्ताहात रोज पहाटे ५ ते ६ वाजता काकडा आरती, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ तसेच रोज रात्री ८.३०. ते १०.३० कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दि.२६ रोजी हरिभक्त प्रल्हाद श्री परमेश्वर महाराज उगले (नांदगाव, ता.जि. नाशिक), दि.२७ रोजी हरिभक्त प्रल्हाद श्री जनार्दन महाराज राजपूत (आर्वीकर), दि.२८ रोजी ह.भ.प. प्रल्हाद विजय महाराज काळे (पिंपळनेरकर), दि.२९ रोजी हरिभक्त प्रल्हाद वासुदेव महाराज डोले (भिवंडीकर) यांचे तर दि.३० रोजी सकाळी ९ ते ११ वाजेदरम्यान, हरिभक्त प्रल्हाद जनार्दन महाराज राजपूत (आर्वेकर) यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर दुपारी १२ वाजता महाप्रसाद वाटप होणार आहे.

या अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे श्रीहरपाल चंद्रसिंग राजपूत यांना (कन्यारत्न प्राप्त झाल्याबद्दल) अनिल राजपूत (कै.सुनील राजपूत यांच्या स्मरणार्थ) कै. पंडित जोहरी मित्रपरिवार (कै. पंडित प्रल्हाद जोहरी यांच्या स्मरणार्थ) रामचंद्र हिरामण सोनार (कै. वत्सलाबाई हिरामण सोनार यांच्या स्मरणार्थ) व रविन रतिलाल भिलाव आणि विजयसिंग चतुरसिंग राजपूत हे पाच यजमान असून त्यांच्याकडून पाच दिवस सेवा देण्यात येणार आहे. या अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहासाठी हभप ज्ञानेश्वर महाराज राजपूत (धावडेकर), मूद वादक हभप पांडुरंग महाराज ठाकरे (कुराडकर), हभप दीपक राजेंद्रसिंग राजपूत (बोरदकर) गायनाचार्य हभप नामदेव महाराज आमले (संभाजीनगर) हभप हर्षल महाराज शिंगारे (कडारी), हरिपाठ नेतृत्व ह भ प महेंद्र महाराज राजपूत (आळंदीकर) टाळकरी साथ जगतगुरु तुकाराम महाराज वारकरी शिक्षण संस्था (देवळी) आदींचे सहकार्य लाभत आहे. जास्तीत जास्त भाविकांनी या अखंड हरिनाम किर्तन सप्ताहाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बोरद ग्रामस्थ व विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ यांनी केले आहे.

## महापालिका भाजपाच्या गटनेतेपदी किरण कुलेवार

### लवकरच करणार सत्ता स्थापन; शहराच्या विकासासाठी काम करण्याचा व्यक्त केला निर्धार

प्रतिनिधी । धुळे



**भारतीय जनता पार्टीतर्फे महापालिका गटनेतेपदी माजी स्थायी समिती सभापती तथा विद्यमान नगरसेविका किरण कुलेवार यांची तर प्रतोदपदी माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेवक भगवान गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

या नियुक्तीनिमित्त नुकताच सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. महापालिका निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक ५० जागा मिळाल्या असून लवकरच सत्ता स्थापनेची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महापालिकेतील पक्षाचे नेतृत्व अधिक मजबूत व संघटित ठेवण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी पक्षाचे पदाधिकारी, नगरसेविका, नगरसेवक उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा अनुभव व कार्यकुशलतेच्या जोरावर महापालिकेत विकासाभिमुख व लोकहिताचे निर्णय घेतले जातील, तसेच भाजपचा गट एकसंघपणे काम करेल, असा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

गटनेत्या किरण कुलेवार यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. तर प्रतोद भगवान गवळी यांनी भाजपची ध्येयधोरणे प्रभावीपणे राबवून संघटन अधिक मजबूत करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आश्वासन दिले.

# उद्योग क्षेत्राचा विकास झाला तर जिल्ह्याचा विकास होईल : पालकमंत्री गुलाबराव पाटील

## पालकमंत्री यांच्याहस्ते महा निर्यात इग्नाईट कन्व्हेन्शन-२०२६चे उद्घाटन

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात नवनवीन छोटे मोठे उद्योग यावेत तसेच युवकांना रोजगार मिळावा यासाठी प्रयत्नशील असून उद्योजक समाधानी तर जिल्हा समाधानी याप्रमाणेच, जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राचा विकास झाला तर जिल्ह्याचा विकास होईल असे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**



जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने आयोजित शासनामार्फत केंद्र सरकारच्या 'जिल्हा जळगाव हे निर्यात केंद्र' या कार्यशाळेचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी खा.स्मिता वाघ, आ.सुरेश भोळे, उद्योग संचालक वृषाली सोनी, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी, जिल्ह्याला औद्योगिक क्षेत्रामध्ये आता डी प्लस क्षेत्राचा दर्जा मिळाला असल्यामुळे जिल्ह्यात नवीन उद्योग येतील. राज्याच्या औद्योगिक धोरणामुळे जळगावला एक चांगली संधी मिळाली आहे, त्यामुळे जिल्ह्यातील विकासाला चालना मिळेल. हा दर्जा जिल्ह्याला मिळण्यासाठी सर्व उद्योजक आमच्या सोबत होते, उद्योजकांना जी मदत लागत होती ती आम्ही केली. डी प्लस दर्जा मिळण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत माझ्यासह जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींनी प्रयत्न केल्यामुळे हा दर्जा मिळाला आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी भरपूर मदत केल्याचे सांगितले.

औद्योगिक क्षेत्रात प्रशिक्षण घेतलेल्या युवकांना नवीन उद्योग उभारण्यासाठी बँकांनी सहकार्य करावे, येणाऱ्या काळात छोटे-छोटे नवीन उद्योग या ठिकाणी घ्यावेत, यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करू. जिल्ह्यातील केळी उद्योगाला चालना मिळावी यासाठी अंगणवाड्यांच्या पोषण आहारात केळीचा समावेश करण्यासाठी सुद्धा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. दर तीन महिन्यांनी उद्योजक व लोकप्रतिनिधी यांची एकत्रित बैठक लावण्यात यावी, अशी सूचना त्यांनी संबंधित विभागाला केली. या कार्यक्रमात, उद्योजकांनी सन्मानपत्र देऊन माझा जो सन्मान केला आहे ही माझ्यासाठी सर्वात मोठी भेट असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

**अडचणी सोडविल्या गेल्या पाहिजेत : खा.वाघ**

खा.स्मिता वाघ यांनी मनोगत व्यक्त करतांना, उद्योजकांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय नवीन उद्योग पुढे जाऊ शकत नाही, जिल्ह्यात छोटे-मोठे उद्योग येणे गरजेचे तर आहेच परंतु छोटे उद्योग सुद्धा जीवंत राहिले पाहिजे त्यांच्या अडचणी सोडविल्या गेल्या पाहिजेत त्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जळगावमध्ये विकासाच्या दृष्टिकोनातून जळगाव विमानतळाला कार्गो सुरू झाले पाहिजे, विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू होण्यासाठी आम्ही सर्व लोकप्रतिनिधी प्रयत्न करत आहोत, असे सांगितले.

● कार्यक्रमात सुरुवातीला मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतंर्गत सेंट्रल बँक ऑफ इंडिया आणि स्टेट बँक ऑफ इंडियामार्फत मंजूर केलेल्या एक अशा चार मालवाहू ई-रिक्षाचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

**उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करणार : आ.भोळे**

यावेळी बोलतांना आ.भोळे यांनी, जळगाव शहरातील उद्योजकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवणे आवश्यक आहे. तसेच विविध प्रकल्प आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी, उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी, प्रशासनातर्फे सुद्धा प्रयत्न सुरू आहेत, बेरोजगार युवकांना नोकरी, नवीन व्यवसायाबाबत माहिती व्हावी यासाठी आगामी काळात जिल्हाधिकारी कार्यालयात एक माहिती कक्ष सुरू करत आहोत. या केंद्रामार्फत प्रशिक्षित युवकांना नोकरीची संधी कुठे कुठे उपलब्ध असेल,व्यवसाय करणाऱ्या युवकांसाठी नवीन व्यवसाय बाबतची माहिती या केंद्रमार्फत दिली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

## पी. डी. पाटील यांचा उत्कृष्ट बीएलओ पुरस्काराने सन्मान



प्रतिनिधी । धरणगाव

येथील महात्मा फुले हायस्कूलचे उपशिक्षक तथा यादी भाग क्रमांक १९९ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पी.डी. पाटील यांना तहसिलदार महेंद्र सूर्यवंशी यांच्याहस्ते उत्कृष्ट बीएलओ पुरस्काराने देऊन सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सामूहिक राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ घेण्यात आली. त्यानंतर धरणगाव तालुक्यातील १० बीएलओ, पर्यवेक्षक आणि कर्मचाऱ्यांना उत्कृष्ट बूथ लेव्हल ऑफिसर पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. जळगाव ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी निवृत्ती गायकवाड, तहसिलदार महेंद्र सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात महात्मा फुले हायस्कूलचे उपशिक्षक तथा यादी भाग क्रमांक १९९ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पी.डी. पाटील यांना देखील तहसिलदार महेंद्र सूर्यवंशी यांच्याहस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पी.डी. पाटील यांनी धरणगाव शहरातील मोठा माळीवाडा परिसरातील मतदार यादी अद्यावत ठेवणे, फॉर्म नंबर सहा, सात, आठ वेळोवेळी भरणे, वर्षभरामध्ये मतदान जनजागृती व विविध कार्यक्रम राबविणे यांसारखी कामे वेळेत आणि उत्तम पद्धतीने पार पाडली आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पी.डी. पाटील यांना यापूर्वी देखील तीन वेळा आदर्श बीएलओ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी महेंद्र सूर्यवंशी, नायब तहसिलदार सी.बी. देवराज यांच्यासह कर्मचारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक नायब तहसिलदार सी.बी. देवराज यांनी केले.

## थोडक्यात

### भालोद येथे रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**यावल ।** तालुक्यातील भालोद येथे पराक्रम दिन व थोर स्वातंत्र्यसैनिक सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त कला व विज्ञान महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी प्रा.एन.बी. सदार, कार्यक्रम समन्वयक प्रा.बी. एम. गोणेठवाड तसेच प्राचार्य डॉ. शैलेश तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### दहीवद येथे ३० रोजी शेतकरी मार्गदर्शन शिबीर

**अमळनेर ।** पपई व इतर पिकांच्या आधुनिक व शास्त्रीय शेती पद्धतींबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने किमया ॲग्रो सोल्युशन्सच्यावतीने शेतकरी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि.३० रोजी सकाळी १०.३० वाजता दहीवद (ता.अमळनेर) येथील महादेव मंदिर परिसरात हे शिबीर पार पडणार आहे. दरम्यान, यावेळी आधुनिक शेती करणाऱ्या १५ विधवा शेतकरी महिलांचा कृषी गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

## बालमोहन विद्यालयात पार पडली महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा



### एक हजारावर विद्यार्थी झाले होते सहभागी

प्रतिनिधी । चोपडा

**विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता ओळखून त्यांना लहानपणापासूनच स्पर्धा परीक्षांसाठी तयार करण्याच्या उद्देशाने घेण्यात येणारी महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा रविवार, दि.२५ रोजी शहरातील बालमोहन विद्यालयात पार पडली.**

इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी, सहावी व सातवी या वर्गांतील एक हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका स्वतंत्र स्वरूपात देण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र आणि गोवा या राज्यात एकाच दिवशी ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षेचे केंद्र संचालक म्हणून जळगाव येथील एस. के. पाटील यांनी संपूर्ण कामकाजावर नियंत्रण ठेवत मार्गदर्शन केले. तसेच बालमोहन विद्यालयाचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पूर्णवेळ उपस्थिती देत परीक्षेचे सर्व कामकाज सुरळीत पार पडण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

परीक्षेचे पर्यवेक्षण चोपडा शिक्षण मंडळ संचलित अध्यापक विद्यालयाच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले. हे पर्यवेक्षण अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.संजय देशमुख व प्रा.पूजा माळी यांच्या सहकार्याने पार पडले. परीक्षेसाठी चोपडा तालुक्यातील जिल्हा परिषद, खाजगी प्राथमिक, माध्यमिक तसेच इंग्लिश मीडियम शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एमटीएस परीक्षेला तालुक्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. परीक्षेचे नियोजन व अंमलबजावणी तालुका समन्वयक आर.डी. पाटील यांनी केली.

पर्यवेक्षणाची जबाबदारी दीक्षा शिरसाठ, देवयानी कोळी, साक्षी शिंदे, वैष्णवी महाजन, हर्षदा पाटील, भूमिका सैंदाणे, प्रणाली खैरनार, भक्ती जाधव, राजश्री पाटील, रोशनी पाटील, सविता ठाकूर, निकिता धनगर, वैष्णवी धनगर, दिव्यानी धनगर, उर्मिला बारेला, नंदिनी बारेला, आरती कोळी, राधिका सोनवणे, वर्षा भिल्ल, प्रियंका कोळी, झिंगुबाई जाधव, साक्षी पावरा, दिव्या बारेला, सपना धनगर, देवेंद्र वानखेडे आदींनी पार पाडली.

## धरणगाव महाविद्यालयात 'इंद्रधनुष्य' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

प्रतिनिधी । धरणगाव

येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन इंद्रधनुष्य २०२५- २६ चे आयोजन करण्यात आले. प.रा.हायस्कूल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अरुण कुलकर्णी यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव डॉ.मिलिंद डहाळे, संचालक नीना पाटील, अजय पगारिया, प्राचार्य डॉ. उदय जगताप, उपप्राचार्य डॉ.व्ही.ए.वारडे, उपप्राचार्या प्रा.आर.पी.चौधरी, विद्यापीठाचे डॉ. के.डी.महाजन, समन्वयक प्रा.एस.एस.पालखे, पर्यवेक्षक प्रा. एस.आर. अत्तरदे, कार्यालयीन अधीक्षक रितेश साळुंखे, वरिष्ठ विभागाचे स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.स्वप्निल खरे, कनिष्ठ विभागाचे स्नेहसंमेलन प्रमुख प्रा.एम.एस. कांडेलकर उपस्थित होते. बक्षीस वितरणासाठी खान्देशी अभिनेत्री पुष्पा ठाकूर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

## चोपडा येथे दिनांक २७ पासुन धनगर समाज प्रिमियर लीग

प्रतिनिधी । चोपडा

समाजातील युवकांना क्रीडा क्षेत्राचे महत्त्व एकोपा व शिस्तीच्या माध्यमाने एकत्र आणण्याचा व युवकांच्या सुप्त गुणांना वाव मिळावे म्हणुन चोपडा तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने चोपडा येथे आबासो एन डी पाटील नगर, नवकार सिटीच्या बाजुला हरेश्वर रोड या ठिकाणी दिनांक २७ जानेवारी ते २९ जानेवारी धनगर समाज प्रिमियर लीग चे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २७ जानेवारी सकाळी ७ वाजता प्रिमियर लीगचे उद्घाटन मुख्य प्रायोजक पं सचे माजी सभापती आत्माराम म्हाळके व सह प्रायोजक आहील्यादेवी होळकर माध्यमिक विद्यालयाचे चेअरमन मधुकर कंखरे सह समाजातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. स्पर्धेत आदित्य सोलर, सुख क्लिनिक,जे एम सी टी,जय मल्हार फार्म हाऊस, शिवाय कन्स्ट्रक्शन, मनोरे वॉरीयर्स, गोपी क्लिनिक, सांगोरे डेव्हलपर्स या आठ संघांनी सहभाग नोंदविला असुन विजेता, उपविजेता संघांना ट्रॉफी सह अनेक बक्षिसे देण्यात येणार आहे. तरी समाज बांधवांनी उपस्थित राहुन प्रिमियर लीगचा लाभ घ्यावा असे आवाहन चोपडा तालुका सकल धनगर समाजाच्या वत्तीने करण्यात आले आहे.




चोपडा । ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रताप विद्या मंदिर येथील कलाशिक्षक कमलेश गायकवाड यांनी त्रिमितीचा आभास निर्माण करणारे भारतीय राजमुद्रा आणि गगनात डौलाने फडकणारा तिरंगा ध्वजाचे चित्र आपल्या रंगीत खडूंच्या साह्याने चित्रीत केले.

# पाचोरा येथे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

## आ.किशोर पाटील, नगराध्यक्षा सुनीता पाटील यांची होती उपस्थिती

प्रतिनिधी । पाचोरा

**येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास शिवसेनेचे आ. किशोर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.**



या वेळी आ. किशोर पाटील, नगराध्यक्षा सुनीता पाटील यांच्याहस्ते बाळासाहेब ठाकरे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. बाळासाहेबांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजासाठी दिलेले योगदानाला उपस्थितांनी या वेळी उजाळा दिला. या प्रसंगी समितीचे सभापती गणेश पाटील, उपनगराध्यक्ष किशोर बारवकर, गटनेता सुमित पाटील, नगरसेवक संजय गोहील, सतिष चेडे, प्रवीण ब्राम्हणे, रहेमान तडवी, संजय चौधरी, संदीप पाटील, प्रदीप वाघ, वाल्मीक पाटील, सुमित सावंत, अशोक पाटील, सुनील पाटील, डॉ. भरत पाटील, किशोर पाटील, उमेश एरंडे, स्वीय सहाय्यक राजेश पाटील, प्रवीण पाटील, पिंटू शिंदे, वैभव राजपूत, जय बारवकर, बबलू पाटील, नितीन पाटील, विजय भोई यांच्यासह बहुसंख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

**वाणेगाव ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन**

वाणेगाव ग्रामपंचायत कार्यालयात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व सुभाषचंद्र बोस यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच अतुल पाटील यांच्याहस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी उपसरपंच जिजाबाई संसारे, ज्योती पाटील, मनीषा पाटील, वर्षा पाटील, ग्रा.पं. सदस्या जैनुद्दिन तडवी, सुकदेव आव्हाड, मुख्याध्यापक मनोज दुसाने, मनोज पाटील, अफसर तडवी, पतिंगराव पाटील, समाधान पाटील, बबन पाटील, अजय संसारे, लोटन सोनवणे, चंद्रभान धुमाळ उपस्थित होते.

## रासेयो शिबिरात अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोनावर मार्गदर्शन

प्रतिनिधी । चोपडा



**येथील भगिनी मंडळ संचलित कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तक गाव निमगव्हाण (ता. चोपडा) येथे संपन्न होत आहे. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व अंधश्रद्धांचे उच्चाटन व्हावे, या उद्देशाने विद्यार्थ्यांना अंधश्रद्धा निर्मूलन व वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.**

कार्यक्रमात चाळीसगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सागर नागणे यांनी विविध सोपे व प्रभावी प्रयोग सादर करत अंधश्रद्धांमागील असत्यता स्पष्ट केली. काही तथाकथित चमत्कार प्रत्यक्ष प्रयोगांद्वारे खोटे ठरवून विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रवृत्त करण्यात आले. प्रत्येक घटनेमागे कारण-परिणामाचा संबंध असतो व अंधविश्वास न ठेवता वैज्ञानिक विचारसरणी स्वीकारणे किती महत्त्वाचे आहे, यावर सागर नागने यांनी भर दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी या प्रयोगांमध्ये सक्रिय सहभाग घेतला व प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करुन घेतले.

**➤ युवकांनी पुढाकार घ्यावा...**

**यावेळी मार्गदर्शन करतांना सागर नागणे यांनी, अंधश्रद्धांपासून समाजाला मुक्त करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, वैज्ञानिक दृष्टिकोन समाजात रुजवावा, असे आवाहन केले. यावेळी रासेयो प्रमुख कार्यक्रम अधिकारी सहाय्यक प्रा.अनिल बाविस्कर, महिला कार्यक्रम अधिकारी सहाय्यक प्रा.मोहिनी पाटील यांच्यासह स्वयंसेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन राधेश्याम कंडारे याने केले तर आभार राणी अहिरे हिने मानले.**